CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २४४ वा | शुक्रवार दि. ३० जून २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## नंदुरबार आरटीओ कार्यालयातून रेतीचा डंपर गायब

**नंदुरबार ।** येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयासमोर जप्त करून ठेवलेला ५ ब्रास रेतीने भरलेला डंपर चोरून नेल्याप्रकरणी




एकाविरुद्ध शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील आर.टी.ओ कार्यालयासमोर वाळूचा डंपर (क्र.डी डी-१-एल ९३७३) जप्त करून उभा करण्यात आला होता. या डंपरमध्ये २५ हजार रुपये किमतीची ५ ब्रास वाळू होती. दरम्यान, दि.२२ ते २३ जूनदरम्यान सदर उभा डंपर शेख कय्युम शेख असलम याने सदर उभा डंपर चोरून नेला.

### न्यूज कॉलम

#### महिलेच्या पर्समधील दागिने लंपास

**धुळे ।** बसस्थानक परिसरातील धुळे-सुरत फलाटाजवळ उभ्या असलेल्या महिलेची पर्स चोरट्याने लंपास केली. यात रोकडसह दागिने मिळून सुमारे दोन लाखांचा मुद्देमाल चोरट्याने चोरून नेला. हर्षला सुनिल चौधरी या महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, त्या बसची वाट बघत उभ्या होत्या. यावेळी चोरट्याने त्यांचे ताब्यातील पर्स संधी साधून लंपास केली.

#### प्रा. पी. एम. खैरनार यांना उत्तर महाराष्ट्र क्रीडारत्न पुरस्कार

**नाशिक ।** येथील जीएमडी महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक पी. एम. खैरनार यांना पालकमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते उत्तर महाराष्ट्र क्रीडा रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी ऑलिम्पियन व अर्जुन पुरस्कार विजेते सईद जलालुद्दीन रिझवी, क्रीडा अधिकारी महेश पाटील, अजय बोरस्ते, अशोक दुधारे आदी उपस्थित होते. मविप्र संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव यांनी खैरनार यांचे अभिनंदन केले.

# जिल्ह्यात धो-धो पावसाला न जुमानता फुलला भक्तीचा मळा

### टाळ, मृदुंगाच्या गजरात वैष्णवजनांनी साजरी केली आषाढी एकादशी

**धुळे । प्रतिनिधी**

आषाढी शुद्ध एकादशीला धुळे शहरातील विठ्ठल मंदिरात मोठ्या उत्साहात आलेल्या वारकर्यांना पावसाने झोडपून काढले, गुरुवारी सकाळी पासून आगमन झालेल्या पावसाने पुन्हा एकदा दमदार हजेरी लावली. त्यामुळे वारकर्यांची गैरसोय झालेली आहे. शहरात सर्वत्र पावसामुळे दलदल निर्माण झाली असून तंबू आणि राहुट्यांध्ये पावसाचे पाणी साठले, रस्ते चिखलमय झाले आणि व्यापार्यांसह छोट्या विक्रेत्यांच्या व्यवसायावरही पाणी पडले. वारकर्यांना पायी चालणे सुद्धा मुशकील झाले आहे.

आषाढी एकादशीनिमित्त धुळे जिल्ह्यात विभागातील वैष्णवजनांनी स्थानिक विठ्ठल मंदिरात तसेच विविध ठिकाणी टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठलाचे नामस्मरण करत दर्शन घेतले. शहरातील विविध मंदिरांमध्ये भाविकांची विठ्ठलाच्या दर्शनासाठी पहाटेपासून आकार वाजेपर्यंत रांगा लागल्या होत्या. तर मंदिर परिसरात आरती, महाप्रसाद, भजन, कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील मालेगाव रोडवर असलेल्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी होणारी भाविकांची गर्दी यंदाही कायम होती. आषाढी एकादशी निमित्त शहर परिसरातील मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप प्राप्त झाले होते. अनेक व्यावसायिकांनी लहान मुलांच्या खेळणी, पाळणे, मिठाईची दुकाने लावली होती. तसेच फुलं-फळ, हार, नारळ तसेच इतरी वस्तू विक्रेत्यांचा यावेळी समावेश होता. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मालेगाव रोडवरील वाहतूक व्यवस्थेत तात्पुरता बदल केला होता. त्यानुसार पहाटे पाच ते रात्री अकरा वाजेपर्यंत या रस्त्यावरील वाहतूक वळविण्यात आली. एकादशीनिमित्त मोबाइलवर विठ्ठल भक्तीचा महापूर आल्याचे दिसून आले. अनेकांनी विठ्ठलच्या वेगवेगळ्या प्रतिमा असलेले मेसेस पाठवून एकमेकांना एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अनेकांनी डीपी आणि स्टेट्सवरही विठू रायाची प्रतिमा ठेवली होती.





#### महाप्रसादाचे आयोजन

**शहरातील दसेरा मैदानाजवळील श्री विठ्ठल मंदिरात भाविकांचा मेळा फुलल्याने वातावरण भक्तीमय बनले होते. तर जिल्ह्यातील विविध मंदिरांमध्ये महाआरती, भजन, कीर्तन, महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. जवळपास सर्वच मंदिरांमध्ये भाविकांनी विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी मोठी गर्दी केली.**

#### प्रति पंढरपूर बाळदे येथे यात्रोत्सव

**शिरपूर । आषाढी एकादशीनिमित्त शिरपूर तालुक्यातील बाळदे येथे प्रतिपंढरपूर मानल्या जाणार्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये भाविकांची अलोट अशी गर्दी दर्शनासाठी झाली होती. विठुरायाच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांनी रांगा लावल्याचे दिसून येत आले. प्रति पंढरपूर म्हणून ख्याती असलेल्या बाळदे येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने यात्रोत्सव भरवला जातो. मोठ्या संख्येने भाविकांनी विठुरायाचे दर्शन घेतले आहे.**



#### पावसातही बंदोबस्तावर पोलीस तैनात

**शहरातील दसेरा मैदानाजवळील विठ्ठल मंदिराच्या परिसरात भाविकांची मोठी गर्दी होते. त्यामुळे गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी धुळे वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी तेथे तैनात होते. उल्लेखनीय बाब म्हणजे पाऊस सुरु असतानाही ते जागेवरच थांबले. वाहतूक पोलिसांच्या कर्तव्यपरायणतेचे भाविकांनीही मोठे कौतुक केले.**

#### अनेकांना सेल्फी घेण्याचा मोह

**यावेळी भाविकांनी जय हरी विठ्ठल, माऊली माऊली असा गजर करीत विठुरायाचे मनोभावे दर्शन घेतले. मंदिर आवारात अनेकांना सेल्फी घेण्याचा मोह आवरता आला नाही. यावेळी भाविकांना साबुदाणा खिचडी, केळी या प्रसादाचे वाटप करण्यात आले.**

## चंद्रशेखर आझाद यांच्यावरील प्राणघातक हल्ल्यातील आरोपींना कठोर शासन करा



### आंबेडकरी अनुयायांची धुळ्यात निदर्शन

**धुळे । प्रतिनिधी**

भीम आर्मी आणि आझाद समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याचा धुळ्यातील आंबेडकरी अनुयायांनी तिव्र शब्दात निषेध नोंदवून निदर्शने केली. जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षकांना निवेदन दिले. चंद्रशेखर आझाद यांना विशेष सुरक्षा पुरविण्यात यावी आणि विशेष केंद्रीय ब्युरोकडून या हल्ल्याचा तपास केला जावा अशी मागणी करण्यात आली आहे.

आझाद समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रशेखर आझाद यांच्यावर दि.२८ जून रोजी उत्तरप्रदेशातील देवबंदमध्ये गोळीबार करुन त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला.या हल्ल्यात सुदैवाने ते बचावले. मात्र कंबरेला गोळी चाटून गेल्याने आझाद हे जखमी झाले आहे. उत्तर प्रदेशात जातीयवाद शिगेला पोहचला आहे. आंबेडकरवादी नेत्यांवर तुरुंगाचा धाक फसल्यानंतर बंदूकीचा धाक दाखवून त्यांची शक्ती दाबण्याचा प्रयत्न केला जात आहे. या देशात सवर्ण जातीयवादी लोक गोळीबार करुन पोलिस प्रशासनासमोर येतात. मागास जातीच्या लोकांना भयभीत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. आमचा राज्य घटनेवर विश्वास असल्याने चंद्रशेखर आझाद यांच्यासाठी विशेष सुरक्षा व्यवस्था देण्यात यावी, जेणेकरुन मागास जातीतील निवडून आलेल्या मोजक्या नेत्यांना देशात मोकळेपणाने बोलता येईल.युपी सरकारच्या दबावाच्या प्रभावापासून दुर असलेल्या राष्ट्रीय सुरक्षा संस्थेच्या मदतीने हल्लेखोरांचा शोध घेण्यात यावा हा हल्ला फक्त चंद्रशेखर आझाद यांच्यावर नसून आंबेडकरी विचार धारेवर झालेला आहे. म्हणून धुळे जिल्ह्यातील आंबेडकरी विचारधारेचे सर्व लहान मोठ्या पक्षांची, संघटनांचे, पदाधिकारी, कार्यकर्ते या भ्याड हल्ल्याचा बसस्थानकाजवळील डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निषेध नोंदवित आहोत,असे निवेदन देण्यात आले आहे. निदर्शने आंदोलनात आनंद लोंढे, किरण गायकवाड, शंकर खरात, अरविंद निकम, सिध्दार्थ पारेराव, दिनेश निकुंभ,योगेश जगताप, संजय अहिरे, निशांत मोरे, आनंद सैदाणे, संजय चव्हाण, भैय्यासाहेब वाघ, किरण भालेराव, उत्तमराव झनके, ॲड.संतोष जाधव, विजय भामरे, प्रशांत वाघ, राहुल वाघ, मुकुंद शिरसाठ,श्रावण खैरनार, मुलचंद शिरसाठ, रामकृष्ण नेरकर,विशाल पगारे सहभागी झाले होते.

## पोलिसांना चकवा देत कार चालकाने जंगलात ठोकली धूम; आठ लाखांची दारु जप्त

**पिंपळनेर । प्रतिनिधी**



पिंपळनेर-नवापूर रस्त्यावर पिंपळनेर पोलिसांना रात्रीच्या वेळी गस्त घालत असताना संशयास्पद रित्या आढळून आलेल्या कारमध्ये अवैधपणे दारूची वाहतूक केली जात असल्याचे उघडकीस आले आहे. या कारवाई दरम्यान पोलिसांनी दारू साठ्यासह लाखो रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दरम्यान संशयित कारसह अंधाराचा फायदा घेत पळून जाण्यात यशस्वी झाला

साक्री तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पिंपळनेर-नवापूर रस्त्यावर मध्यरात्रीच्या सुमारास पोलीस पथक गस्त घालत असताना, पोलिसांना पांढऱ्या रंगाची कार संशयास्पद रित्या आढळून आली. पोलिसांनी या कारचालकाला कार थांबविण्याचा इशारा देखील केला, परंतु कारचालकाने भरधाव वेगाने कार पळवत नेली व त्यावर संशय बळवल्याने पोलिसांनी तात्काळ या कारचा पाठलाग केला. परंतु काही अंतरावर गेल्यानंतर कार चालकाने रस्त्याच्या कडेला जंगलाच्या दिशेने कार उभी करून जंगलात पळ काढला. या कारवाईदरम्यान पोलिसांनी पाठलाग करून देखील अंधाराचा फायदा घेत हा कारचालक पळून जाण्यात यशस्वी झाला. वाहनाच्या मागील सीटवर तसेच डिक्कीमध्ये देशी -विदेशी दारू भरून घेऊन जात असल्याचे निरदर्शनास आले.सदर मद्यसाठा हा चोरट्या वाहतुकीने गुजरात राज्यात घेऊन जात असल्याचे निरदर्शनास आले असून एकुण ८,६३,८६१/- मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुडील तपास पो ना अतुल पाटील करीत आहेत.पोलीस अधीक्षक संजय बारकुंड,अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे,उपविभागीय पोलिस अधिकारी साजन सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सा पो नि श्रीकृष्ण पारधी ,पो हे कॉ ६३१ कांतीलाल अहिरे असई लक्ष्मण गवळी,असई अशोक पवार ,पो ना अतुल पाटील,पो कॉ पंकज वाघ पो का रवींद्र सूर्यवंशी पो का राकेश बोरसे यांचा सहभाग होता. या कारवाईदरम्यान पोलिसांनी तब्बल आठ लाखांहून अधिकचा दारू साठ्यासह मुद्देमाल हस्तगत केला आहे, चोरट्या मार्गाने अवैधपणे गुजरातकडे या दारूची वाहतूक केली जात असल्याचा संशय पोलिसांना असून पुढील तपास पिंपळनेर पोलीस करीत आहेत.

## प्रशांत दामलें नी जिंकलेले साडेबारा लाख नाट्यपरिषदेस दिले!

**मुंबई । प्रतिनिधी**

सोनी मराठी वाहिनीवर प्रसारित होणारा 'कोण होणार करोडपती' हा कार्यक्रम सध्या लोकप्रियतेच्या शिखरावर आरुढ झाला आहे. सेलिब्रेटी या कार्यक्रमात भाग घेताना दिसतात. मराठी रंगभूमीवरचा सुपरस्टार आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले आणि ज्येष्ठ अभिनेत्री कविता मेढेकर या जोडीने 'कोण होणार करोडपती' या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदविला. त्यानं साडेबारा लाख पारितोषिक जिंकलं. ही सर्व पारितोषिकाची रक्कम त्यानं अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेकडे सुपूर्द केली.

प्रशांत दामले म्हणाले, माझा नाट्यव्यवसाय जोरात सुरू आहे. नाटकंही जोरात चालली आहेत. त्यामुळे जिंकलेल्या पारितोषिकाची रक्कम नाट्य परिषदेला देण्याचा निर्णय आम्ही दोघांनी घेतला.



'कोण होणार करोडपती' खेळताना मनात धाकधूकही होतीच. हॉट सीटवर बसल्यावर प्रश्न काय विचारले जातील हे टेन्शन होतंच. सुरुवातीचे प्रश्न सोप्पे होते. पण नंतर कठीण प्रश्नांची साखळी सुरू झाली. एका प्रश्नाला मला संकर्षण कऱ्हाडे आणि प्रेक्षक या दोन लाइफलाईन घ्याव्या लागल्या. माझ्या परींनं जेवढं नाट्य परिषदेसाठी करता येईल तेवढं करीत राहणार. अशी स्पर्धा खेळण्याची माझी पहिलीच वेळ होती. दरम्यान, शनिवार, १ जुलै रोजी रात्रौ ९ वाजता 'कोण होणार करोडपती' कार्यक्रमात माझा एपिसोड सोनी मराठी वाहिनीवरून प्रसारित होणार आहे.

## खलाणे गावातून शिंदखेडाकडे जाणारा रस्ता नित्कृष्ठ


### परिसरातील नागरिकांचा वाढला संताप

### पाण्यात रस्ता की रस्त्यात पाणी

**प्रमोद शिंपी। चिमठाणे**

शिंदखेडा तालुक्यातील खलाणे गावातून निशाणे शिंदखेडा कडे जाणारा रस्ता हा काही महिन्यापूर्वी नवीन करण्यात आला. त्याबद्दल गावकरी ही आनंदाचे वातावरण होते परंतु पहिल्या पावसाळा सुरु झाला व पहिल्याच पाऊसात रस्त्याची दैनिय अवस्था समोर आला आहे.

या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून पाई जाणारे नागरिक व मोटारसायकल चालक यांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो आहे. तसेच पाण्यात रस्ता की रस्त्यात पाणी ? असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. रेशन दुकान परिसर ते परेश पाटील यांच्या घरा पर्यंत पाणी साचले आहे. पाण्याचा निचरा होण्यासाठी देखील पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. रस्ता खोल झाल्याने पाण्याचा निचरा होण्यासाठी देखील अडचणी निर्माण झाल्या आहे. गावातील परिसरलगत रस्त्याची लेव्हल ही खोल असून वारंवार पी. डब्लू डी. चे इंजिनियर तेथे आल्यावर त्यांच्या निर्दशनास ग्रामस्थांनी आणून दिले. पाणी तेथेच तुंबत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास हानी कारक आहे. पाणी साचल्याने तेथे दुर्गन्धी व डास खूप झाले आहेत. ह्या गोष्टीमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका झाल्यास पी.डबलू .डी. जबादार राहील असा इशारा देखील संतप्त नागरिकांनी दिला आहे. रस्त्याची पाहणी करून रस्त्याचे काम मार्गी लावावे अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांनी केला आहे. अन्यथा उपोषण करू असा इशारा देखील दिला आहे.



#### पाणी रस्त्यावर तुंबते

**रस्त्याचे काम अतिशय नित्कृष्ठ रित्या झाले आहे. रस्त्याची लेव्हल ही खोल केली गेली. तेथे भरीव काम करून मग डामरीकरण होने गरजेचे होते. पाण्याचा पर्यायी मार्ग नसल्याने पाणी रस्त्यावर तुंबते आहे. त्यांचा परिणाम माझ्या परिसरातील ग्रामस्थांच्या आरोग्यास हानी पोहोचते आहे. इंजिनियर यांना देखील ही बाब सांगितल्या नंतर देखील दखल घेतली जात नाही. याचे कारण काय असा देखील प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. - परेश राजेंद्र पाटील, ग्रामस्थ खलाणे**

## आता आमदारसुद्धा मनपाच्या विरोधात उपोषण करणार


धुळे महापालिकेच्या विरोधात शिवसेना (ठाकरे) गट राष्ट्रवादी, काँग्रेस आणि समाजवादी पार्टीतर्फे पाणीटंचाई, सार्वजनिक शौचालय, रस्त्याच्या समस्या याविषयावर आंदोलन करण्यात आले. शिवसेना (ठाकरे) गटातर्फे तर दररोज आंदोलन आणि निवेदन देण्यात येत आहे. आता शहराचे आमदार फारुख शाह यांनी महापालिकेतील भोंगळ कारभाराविरोधात सोमवारी उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात सोशल मिडिया मेसेज व्हायरल झाले आहे. मेसेजमध्ये आमदारांनी महापालिकेच्या भोंगळ कारभाराविरोधात आपण आंदोलन करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून धुळेकर मोठ्या समस्यांना तोंड देत आपले दैनंदिन जीवन जगत आहेत. दहा वर्षांचे दशक संपल्यानंतर नव्या दशकात धुळेकरांच्या नशिबी चांगल्या सुविधा येतील का ? असा प्रश्न आता सातत्याने उपस्थित होत आहे. नव्या दशकात शहराचा विकास कसा राहिल ? यावर भाष्य करण्यासाठी शक्यतो कोणताही ज्योतिष बोलायला तयार नाही. कारण गेल्या काही वर्षांपासून केवळ धूळ, चिखल, माती अन् खड्डे अशाच समस्यांना तोंड देत आहेत आणि उदासीन प्रशासन व सत्ताधाऱ्यांचा ढिसाळ कारभार पाहता भाकित वर्तविणेदेखील चुकीचे ठरणार आहे. शहरातील असा कोणताही कोणताही भाग नाही की ज्याठिकाणचा रस्ता फुटलेला नाही. हे खड्डे विकासाचे असले तरी आता या विकासाच्या खड्यांचा वीट धुळेकरांना येऊ लागला आहे. ढिसाळ मनपा प्रशासन व सत्ताधाऱ्यांचा नियोजनाअभावीच धुळेकरांवर ही वेळ आली आहे. नियमितपणे कर भरणा करूनदेखील मूलभूत सुविधांसाठी वंचित रहावे लागत आहे. सत्ताधाऱ्यांना एकही योजना धड चांगल्याप्रकारे राबवितादेखील येत नसल्याने धुळेकराची ओळख आता खड्डेगाव, धूळ गाव अशी होऊ लागली आहे. त्यातच आता शहरातील शौचालयाची देखील दुरावस्था झाली आहे. सर्व समस्यांमुळे शहराचे आमदार फारुख शाह यांनी महापालिकेतील भोंगळ कारभाराविरोधात सोमवारी उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे आता आमदारच मुलभूत प्रश्नांवर प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी थेट उपोषणाला बसणार आहेत.



#### रस्ते, पाणी आणि वाहतूककोंडी

**धुळे शहर परिसरात रस्त्यावरील खड्ड्यासाठी आणि पावसाळ्यात झालेल्या रस्त्यांच्या दुरावस्था, पाणीटंचाई, सार्वजनिक शौचालय, रस्त्याच्या अश्या अनेक समस्यांसाठी नागरिकांनी अनेकदा लहान मोठी आंदोलनं केली आहे. रस्त्यांवर साचलेल्या पाण्यात झोपूनही अनेक नागरिकांनी आंदोलन करुन प्रशासनाचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र प्रशासनाने त्याकडे कायम दुर्लक्ष केल्याचं चित्र आहे. त्यामुळे आता आमदारच मुलभूत प्रश्नांवर प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी थेट उपोषणाला बसणार आहेत.**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.७०५७०१११२६

## माझा पाठिंबा होता, तर मग चोरून शपथ का घेतली?

### फडणवीसांची गुगलीवर विकेट गेली, पवारांची स्पष्टोक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

पाटणा येथे १७ पक्षांनी एकत्र येवून बैठक घेतली. त्यावेळी मोदी अमेरिकेत होते. तेथून आल्यानंतर त्यांनी बैठकीची माहिती घेतल्यानंतर त्यांची अस्वस्थता वाढली आहे. त्यामुळे आगामी निवडणूकीत काय होईल. या भीतीने मोदी अशा प्रकारचे विधाने करत आहेत. तर फडणवीसांनी अन्य विधाने करण्यापेक्षा राज्यातील कायदा व सुव्यवस्था सुधारावी त्याकडे लक्ष द्यावे, असा हल्ला पवारांनी केला.

अजित पवारांनी माझ्यासोबत शपथ घेतली होती. त्यामागे शरद पवार होते, असे विधान फडणवीसांनी केले. त्यावर शरद पवारांनी प्रत्युत्तर दिले. म्हणाले की, गुगली टाकली की नाही मला माहित नाही. पण गुगलीवर फडणवीसांची विकेट गेली, माझी विकेट गेली, असे कोणी कसे सांगणार, असे बोलत त्यांनी फडणवीसांना टोला लगावला. माझा पाठिंबा होता. मग मी त्यांना नकार दिला. मग त्यांनी चोरून शपथ का घेतली. दुसरीकडे ही मी गुगली टाकली होती असे लोक म्हणतात, पण मला माहित नाही ही गुगली आहे की नाही, पण या गुगलीवर फडणवीसांची विकेट पडली.फडणवीसांवर टीका केली.

## औट घटकेचे बंड

गेल्या आठवड्याच्या अखेरीस रशियातील एका घडामोडीने जग विस्मयचकित झाले. 'वॅग्नर आर्मी' या नावाने ओळखल्या जाणार्या खासगी सैन्याने अचानक अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या विरोधात उठाव केला. या सैन्याचा प्रमुख येव्गिनी प्रिगोझिन याने पुतिन यांना सत्तेतून हुसकावून लावण्याचा निर्धार व्यक्त केला होता. रशियाच्या लष्कराचे दक्षिण मुख्यालय ताब्यात घेतल्याचा दावाही त्याने केला होता. त्याचे सैनिक मॉस्कोच्या दिशेने गेलेही होते. पण, नंतर पडद्याआड काही हालचाली झाल्या, पुतिन यांनी स्वत: किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी प्रिगोझिन याच्याशी चर्चा केली आणि त्याने माघार घेत असल्याचे जाहीर केले. तो नंतर काही सहकार्यांसह बेलारूसमध्ये गेला. यामुळे पुतिन यांच्या प्रतिमेस तडा गेला आहे की नाही यावर जगात चर्चा झाली. या अनपेक्षित बंडावर पाश्चात्त्य देशांनी सावध प्रतिक्रिया दिली. हा रशियाचा अंतर्गत प्रश्न आहे, आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत; अशा स्वरूपाची ही प्रतिक्रिया होती. मात्र या घटनेमुळे रशियातील संरक्षण क्षेत्रात सर्व काही आलबेल नाही हे उघड झाले. पुतिन यांच्या नेतृत्वाला आव्हान मिळू शकेल का? यावर आताच काही मत व्यक्त करणे योग्य होणार नाही. कारण पुतिन यांची सत्तेवरील पकड अजूनही मजबूत आहे. पण, वरिष्ठ पातळीवर त्यांच्या विरुद्ध असंतोष असल्याचे बोलले जाते.

पुतिन यांचा रशियाच्या सत्तेत जसजसा प्रभाव वाढत गेला तसतसे येव्गिनी प्रिगोझिन याचेही प्रस्थ रशियात वाढत गेले, हा इतिहास जगात सर्वांना माहीत आहे. सामान्य पातळीपासून सुरुवात केलेल्या प्रिगोझिन याने रशियाच्या राजकीय व लष्करी वर्तुळात शिरकाव करून घेतला. तो अत्यंत श्रीमंत आहे. पुतिन यांच्या आशीर्वादानेच त्याने खासगी सैन्य स्थापले. युक्रेनवर आक्रमण करण्याचा पुतिन यांनी निर्णय घेतला तेव्हा त्यांनी वॅग्नर आर्मीची मदत गृहीत धरली होती असे आता जाणवते. या सैन्यातील भाडोत्री सैनिक अत्यंत क्रूर पण लढण्यात कुशल असल्याची ख्याती आहे. युद्धाच्या सुरुवातीच्या काळात युक्रेनच्या लष्कराची मोठी जीवित हानी झाली त्याचे कारण वॅग्नर आर्मी हे आहे. युक्रेनमधील सोलेदार व बाख्मुत हे भाग रशियाच्या लष्कराने नव्हे, तर वॅग्नर आर्मीने जिंकले व नंतर रशियाच्या ताब्यात दिले होते. त्यांना पैसा व दारूगोळा अर्थातच रशिया म्हणजेच पुतिन पुरवत होते. मात्र काही दिवसांपूर्वी प्रिगोझिन याने युद्धातून माघार घेत असल्याचे जाहीर केले होते. रशियाचे लष्करी अधिकारी योग्य प्रकारे युद्ध लढत नसल्याचे त्याने म्हटले होते. आपल्याला पुरेशी शस्त्रे व दारूगोळा मिळत नसल्याचीही त्याची तक्रार होती. त्या नंतर थोड्याच दिवसांनी त्याने बंड केले. रशियाच्या लष्करातील अनेक बडे अधिकारी प्रिगोझिनवर नाराज आहेत. सर्व खासगी सैन्ये लष्कराच्या अखत्यारीत आणण्याचा प्रस्ताव संरक्षण मंत्री सर्गेई शोइगु यांनी मांडला होता. आपले अस्तित्व यामुळे धोक्यात येईल असा प्रिगोझिनचा समज झाला. त्यामुळेच बंड केल्यानंतर त्याने शोइगु व लष्कर प्रमुख व्हॅलेरी गेरासिमोव्ह यांना आपल्या ताब्यात देण्याची मागणी केली होती. बहुधा ती पुतिन यांना रुचली नसावी. बंडाचे वृत्त पसरताच पुतिन यांनी दूरचित्रवाणीवरून देशास उद्देशून भाषण केले. त्यात त्यांनी हे बंड म्हणजे पाठीत सुरा खुपसण्यासारखे आहे असे म्हटले व बंडखोरांना धडा शिकवण्याचेही जाहीर केले. त्यानंतर थोड्या वेळाने प्रिगोझिन याने बंड मागे घेत असल्याचे जाहीर केले. पुतिन यांना सत्तेतून दूर करण्याचा आपला इरादा नव्हता, अशी सारवासारवही केली. रशिया व प्रिगोझिन यांच्यात काय करार झाला ते गुलदस्त्यात आहे. पण, तो बेलारूसला गेला व त्याचे सैनिक खंदकात परतले. बेलारूसचा हुकूमशहा लुकाशेन्को आणि तो जुने मित्र आहेत. लुकाशेन्को पुतिन यांचाही मित्र आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण किती गुंतागुंतीचे असते त्याची झलक या घटनेने जगास दिसली. वॅग्नर आर्मी नसल्याने कदाचित युक्रेनमधील रशियाच्या आक्रमणाची धार थोडी कमी होऊ शकते. हे युद्ध पुतिन अहंकारापोटी थांबवणार नाहीत. मात्र शक्तिशाली समजल्या जाणार्या सत्ताधीशालाही आव्हान मिळू शकते हे या औट घटकेच्या बंडाने दिसले.

# ऐक्य हवे, पण काँग्रेस नको



बिहारचे मुख्यमंत्री व जनता दल युनायटेडचे सर्वेसर्वा नितीश कुमार यांच्या पुढाकाराने पाटणा येथे भाजप विरोधकांची २३ जूनला बैठक झाली. काँग्रेसपासून उबाठा सेनेपर्यंत देशातील १५ राजकीय पक्षांचे ३२ नेते या बैठकीला उपस्थित होते. कोणत्याही परिस्थितीत २०२४मध्ये होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत भाजपला केंद्रातील सत्तेवरून खाली खेचायचे आणि नरेंद्र मोदींना हटवायचे असा निर्धार या बैठकीत करण्यात आला. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत जे पक्ष काँग्रेस आणि भाजपच्या विरोधात लढले, एवढेच नव्हे तर एकमेकांच्या विरोधातही लढले, ते मोदी हटावसाठी पाटणा येथे नितीश कुमार यांच्या निवासस्थानी एकत्र आले होते. बैठकीचा निचोड काय या प्रश्नाचे उत्तर शोधले, तर येत्या लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांनी एकच उमेदवार उभा करायचा, विरोधी पक्षांचे मत विभाजन होऊ नये, याची दक्षता घ्यायची व भाजपचा पराभव करायचा असे सांगण्यात आले. सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला ३७ टक्के मते मिळाली म्हणजे ६३ टक्के मतदार हा भाजपच्या विरोधात आहे, असे गृहीत धरून विरोधी पक्षांच्या बैठकीत भाजपचा पराभव करण्याचा हिशेब मांडण्यात आला. पाटण्याची बैठक म्हणजे विरोधकांचे एक सुंदर स्वप्नरंजन होते, असेच म्हणावे लागेल. कारण बैठकीनंतर आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेसवर आगपाखड करायला सुरुवात केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदींची वाढती जागतिक लोकप्रियता बघून विरोधी पक्षांची तारांबळ उडाली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर मोदींचा उल्लेख 'विश्वगुरू' किंवा 'बॉस' असा होत असल्याने विरोधकांची बोबडी वळली आहे. मोदी जिथे जातील त्या देशात अनिवासी भारतीयांकडून मोदींचे जल्लोशात होणारे स्वागत आणि मोदी-मोदी असा होणारा जयघोष ऐकून विरोधक धास्तावले आहेत. मोदींच्या नऊ वर्षांच्या कारकिर्दीचा कामाचा आलेख भाजपच्या वतीने देशभर आक्रमकपणे मांडला जातो आहे म्हणून विरोधक अस्वस्थ आहेत. देशभर वंदे भारत ट्रेनने क्रांती घडवली आहे. म्हणून विरोधकांच्या पोटात दुखू लागले आहे. त्यातच ईडी आणि सीबीआय व इन्कम टॅक्सकडून आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्यांना चाप लावले जात असल्याने काहींना घामटे फुटले आहे. सन २०२४ ला मोदी पुन्हा पंतप्रधान झाले, तर राजकारणातून आपल्याला गाशा गुंडाळावा लागेल, अशी भीती अनेकांना वाटते आहे. म्हणूनच काहीही करू पण मोदी नकोत, या एकाच मुद्द्यावर विरोधी पक्ष एकत्र येत आहेत. पाटणा येथे झालेल्या विरोधी पक्षांच्या बैठकीला नितीश कुमार, ललन सिंह (जनता दल यू), राहुल गांधी, केसी वेणुगोपाल (काँग्रेस), ममता बॅनर्जी, अभिषेक बॅनर्जी (तृणमूल काँग्रेस), एम. के. स्टॅलिन, टी. आर. बालू (द्रमुक), अरविंद केजरीवाल, भगवंत मान, संजय सिंह, राघव चड्डा (आम आदमी पक्ष), हेमंत सोरेन (झारखंड मुक्ती मोर्चा), शरद पवार, प्रफुल पटेल, सुप्रिया सुळे (राष्ट्रवादी काँग्रेस), लालू प्रसाद यादव, तेजस्वी यादव, संजय झा (राजद), अखिलेश यादव (सपा), फिरहाद हकीम (एआयटीसी), उद्धव ठाकरे, संजय राऊत व आदित्य ठाकरे (उबाठा सेना), मेहबुबा मुफ्ती (पीडीपी), ओमर अब्दुल्ला (नॅशनल कॉन्फरन्स), सीताराम येच्युरी (सीपीएम), डी. राजा (सीपीआय) अशा नेत्यांनी मुठी आवळून भाजपला सत्तेवरून खाली खेचण्याचा निर्धार बोलून दाखवला. पुढील बैठक सीमला येथे जुलै महिन्यात घेण्याचे ठरले. बिहारमध्ये जनता दल यु आणि राजद म्हणजे नितीश कुमार व लालू प्रसाद यादव यांची सत्ता आहे. हिमाचल प्रदेशात काँग्रेसचे सरकार आहे. जिथे बिगर भाजप सरकार आहे. त्या राज्यात विरोधी पक्षांच्या ऐक्याची बैठक घेण्याचा खेळ पुढील काही महिने बघायला मिळेल.

नितीश कुमार हे सतत सत्तेच्या परिघात राहिलेले आहेत. कधी मुख्यमंत्री, तर कधी केंद्रात मंत्री. कधी भाजपच्या मदतीने तर कधी राजदचा हात धरून त्यांनी कायम सत्ता मिळवली आहे. आता त्यांना विरोधी पक्षांचे सर्वमान्य नेते व्हायचे आहे. थोडक्यात त्यांना देशाच्या पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली आहेत. ज्या नरेंद्र मोदींनी त्यांच्या पक्षासाठी बिहारमध्ये प्रचार केला आणि मुख्यमंत्रीपदावर बसवले त्याच मोदींना हटविण्यासाठी ते उतावीळ झाले आहेत. पाटण्यातील बैठकीनंतर सोशल मीडियावर पंतप्रधानपदाची महत्त्वाकांक्षा असलेल्या १९ नेत्यांचा या बैठकीत सहभाग होता, अशा पोस्ट व्हायरल झाल्या आहेत. मोदींनंतर आपणच अशा आविर्भावात अनेक विरोधी नेते वावरताना दिसत आहेत. भाजपच्या विरोधात देशात एकास एक लढत द्यावी, अशी चर्चा पाटण्याच्या बैठकीत झाली. पण बैठकीनंतर पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी म्हटले - विरोधकांची महाआघाडी ही दिल्लीत असेल. पश्चिम बंगाल संभाळायला आम्ही समर्थ आहोत. भाजपच्या विरोधात महाआघाडी बनविण्याची भाषा पाटणा येथील बैठकीत करतात, मग पश्चिम बंगालमध्ये काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष तृणमूल काँग्रेसच्या विरोधात एकत्र येण्याची भाषा का करतात? काँग्रेस आणि डावे पक्षच विरोधकांच्या ऐक्यात बाधा निर्माण करीत आहेत. पश्चिम बंगालमध्ये पंचायत राज निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. एका प्रचार सभेत ममतादीदी म्हणतात-पश्चिम बंगाल आम्हीच बघणार. येथे (विरोधकांची) अपवित्र आघाडी आम्ही होऊ देणार नाही. पश्चिम बंगालमधून मार्क्सवादी कम्युनिस्ट, काँग्रेस आणि भाजप या सर्वांना हटवण्याचा निर्धार करा. इथे फक्त तृणमूल काँग्रेसच्या निवडणूक चिन्हावर बटण दाबा. बंगालबाबत आम्ही कोणाशीही समझोता करणार नाही. पंचायतपासून विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत फक्त आमचेच चालेल.

दिल्ली राज्याच्या कार्यक्षेत्रात नोकरशहा व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार राज्य सरकारला (केजरीवाल सरकारला) आहेत, असा आदेश न्यायालयाने दिला. त्यानंतर लगेचच केंद्राने अध्यादेश काढून हे अधिकार नायब राज्यपालांना बहाल केले. यावरून केजरीवाल व त्यांच्या पक्षाचा गेले महिनाभर थयथयाट चालू आहे. संसदेच्या येत्या पावसाळी अधिवेशनात हा अध्यादेश संसदेच्या पटलावर मंजुरीसाठी सरकारतर्फे मांडण्यात येईल, तेव्हा त्याला सर्व विरोधी पक्षांनी कडाडून विरोध करावा व अध्यादेश फेटाळून लावावा यासाठी केजरीवाल व त्यांचे सहकारी सर्व विरोधी पक्षांचे उंबरठे झिजवत आहेत. भाजप व काँग्रेस हे दोन्ही आपचे कट्टर शत्रू. या दोन्ही पक्षांचा केजरीवाल यांनी दिल्लीतून विधानसभा निवडणुकीत दारूण पराभव केला. मग ते कशाला 'आप'ला मदत करतील? दिल्लीचे काँग्रेसचे नेते अजय माकन म्हणतात, दिल्ली अध्यादेशाला विरोध करण्यासाठी केजरीवाल काँग्रेसकडे समर्थन मागत आहेत व दुसरीकडे काँग्रेसविरोधी भाषा सतत बोलत आहेत. राजस्थानात जाऊन तीन वेळा मुख्यमंत्री झालेल्या अशोक गेहलोत यांच्याही ते विरोधात बोलतात. काँग्रेस दिल्ली अध्यादेशाला विरोध करणार नसेल, तर आम्ही विरोधी पक्षांच्या बैठकीला कशाला हजर राहायचे? असा प्रश्न केजरीवाल यांनी विचारला आहे. 'मैं नफरत कीं बाजार में मुहब्बत की दुकान खोलकर बैठा हूं' असे राहुल गांधी सतत म्हणत असतात. मग दिल्लीच्या प्रश्नावर 'आप'ला का सहकार्य करीत नाहीत? असा केजरीवाल यांचा प्रश्न आहे.

अध्यादेश हा संसदेच्या अधिवेशनात येतो, तेव्हा तिथे विचार करायचा असतो, बाहेर नव्हे, असे मल्लिकार्जून खरगे यांनी सांगून केजरीवाल यांना फटकारले आहे. मार्क्सवादी नेते सीताराम येच्युरी हे पाटण्यातील बैठकीला होते पण केरळमध्ये त्यांची सत्ता आहे. केरळ पोलिसांनी सुधाकरन या प्रदेश काँग्रेस नेत्याला अटक केली, यावरून काँग्रेसने सीपीएम विरोधात रान उठवले आहे. राहुल गांधी यांनी तर, सुडाच्या राजकारणाला आम्ही कधीच घाबरत नाही, असे ट्वीट केले आहे. ओमर अब्दुला व मेहबुवा मुफ्ती यांची नाराजी आणखी वेगळी आहे. भाजपला पराभूत करण्यासाठी विरोधकांचे ऐक्य हवे, पण मोदी सरकारने जम्मू-काश्मीरला दिलेला ३७० कलमाचा विशेषाधिकार रद्द केला व या राज्याचे विभाजन केले तेव्हा पाटणा येथे जमलेले विरोधी पक्ष कुठे होते, असा प्रश्न ते विचारत आहेत.

# विद्येचे माहेरघर की, क्राइम कॅपिटल?

पुणे हे विद्येचे माहेरघर मानले जाते. पुणे शहरात महाराष्ट्रातून नव्हे तर देशाच्या विविध भागांतील मुले शिक्षणासाठी पुण्यात येतात. अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत साधारणत: सलग चार-पाच वर्षे मुलांचा पुण्यात मुक्काम असतो. वास्तव्य महाविद्यालयातील वसतिगृहात किंवा मुले ग्रुप करून भाडेतत्त्वावर जवळपास रूम घेऊन राहतात. अभ्यास करत असतात. घरापासून लांब राहून, तसेच कुटुंबापासून दूर असताना या मुलांपुढे एकच फोकस असतो, तो म्हणजे अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण होणे. त्यामुळे पुण्यातील मेडिकल कॉलेज, इंजिनीअरिंग कॉलेज असो किंवा आयटी क्षेत्राच्या परिसरात १८ ते २५ वयोगटांतील मुले आपल्याला अत्यंत मोकळेपणाने फिरताना दिसतात. मात्र, गेल्या आठवड्याभरात दोन तरुणींवर प्राणघातक हल्ल्याच्या घटनेमुळे शिक्षणासाठी पुण्यात



आलेल्या मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. दोन्ही हल्ल्यात परिचित व्यक्ती आरोपी असला तरी, मुलींना शिक्षणासाठी घरापासून दूर पाठवायचे की नाही असा चिंता करणारा सवाल सध्या पालकवर्गाला सतावत आहे.

आठवड्याभरातील पहिली घटना म्हणजे एमपीएससी टॉपर दर्शना पवार हिच्या हत्येची. राजगड किल्ल्याच्या पायथ्याशी दर्शनाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत सापडला होता. पुणे ग्रामीण पोलिसांनी शिताफीने तिचा मित्र राहुल हंडोरेला ताब्यात घेत अटकेची कारवाई केली. दर्शना पवार आणि राहुल हंडोरे हे एकमेकांचे दूरचे नातेवाईक. दर्शनासोबत लग्न करण्याची राहुलची इच्छा होती; परंतु नात्यात असल्यामुळे पवार कुटुंबीयांचा या लग्नाला विरोध होता. घरच्यांनी तिचे इतरत्र लग्न ठरवले होते. दर्शना ही नुकतीच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली होती, तर दुसरीकडे राहुल मात्र परीक्षेत अपयशी झाला होता. त्यातच लग्नाला कुटुंबीयांचा विरोध असल्याच्या रागातूनच राहुलने दर्शनाची हत्या केल्याची प्राथमिक माहिती तपासात उघड झाली आहे. दुसरी घटना ही पुण्यातील सदाशिव पेठेत घडली. मंगळवारी सकाळी एक थरार पाहायला मिळाला. त्याची महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत चर्चा होती. एका हल्लेखोराने तरुणीचा पाठलाग करत तिच्यावर कोयत्याने वार केला. मात्र, प्रसंगावधान राखत दोन युवकांना या हल्लेखोराला रोखण्यास यश मिळाले. हल्लेखोर कोयता उगारून तरुणीच्या डोक्यावर प्रहार करण्याच्या तयारीत होता. तेवढ्यात लेशपाल या तरुणाने थेट या हल्लेखोराचा हात धरला आणि कोयता हिसकावला. त्यानंतर अनेक लोक नंतर जमले आणि तरुणीचा जीव वाचवला; परंतु घटना घडताना उघड्या डोळ्यांनी पाहणारे रस्त्यावरील नागरिकांनी सुरुवातीला बघ्याची भूमिका घेतली होती. तो तरुण मध्ये पडला नसता तर काय घडले असते, याचे चित्र आता निर्माण झाले आहे. लेशपाल या तरुणाच्या धाडसाचे आता सर्वत्र कौतुक होत असताना, बघ्याची भूमिका घेणाऱ्यांवर टीका होत आहे. आपली बहीण किंवा जवळची नातेवाईक असती, तर अशी बघ्याची भूमिका कोणी घेतली असती का? अशी चर्चा सजग पालक करत आहेत. लेशपालने हल्लेखोराला थेट पोलिसांच्या हवाली केल्याने पुढील अनर्थ टळला. पुण्यातील विश्रामबाग पोलीस स्टेशनमध्ये आरोपी हल्लेखोरावर गुन्हा दाखल झाला. तो सध्या पोलीस कोठडीची हवा खात आहे. प्रेमाला नकार दिल्याच्या रागातून ही सगळी घटना घडल्याचे कारण सांगण्यात येते; परंतु या घटनांमध्ये पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या एकूण विद्यार्थिनी, त्याचे पालक यांच्या जीवाची घालमेल होत असल्याचे दिसून येत आहे. सदाशिव पेठेसारख्या गर्दीच्या ठिकाणी हा प्रसंग घडल्यावर देखील बराच वेळ पोलिसांचा पत्ता नव्हता असे स्थानिकांचे म्हणणे आहे. यामुळे पुण्यातील कायदा आणि सुव्यस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुणे पोलीस नक्की काय करतायत?, असा प्रश्न पुणेकर विचारत आहे. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करणारे विद्यार्थी हे मोठ्या ध्येयाने पिछाडलेले असतात. त्यात त्यांची मेहनत, परीक्षेबरोबर आयुष्यातील महत्त्वाची वर्षे ही विशिष्ट हेतूने अभ्यासासाठी वाहून घेतात. तारुण्याच्या उंबरठ्यावर असताना अभ्यासाच्या निमित्तानेही मित्र-मैत्रिणी एकत्र येतात; परंतु कोयत्या हल्ल्याच्या दोन घटनांच्या पार्श्वभूमीवर कोणाशी मैत्री करायची आणि कोणाशी नाही, असा प्रश्न मुलींसमोर उभा राहिला आहे. पालक मंडळी घरी असली तरी त्यांचे लक्ष हे मुलांच्या काळजीत अडकलेले असते.

## शब्दकोडे-१०७



आडवे शब्द

१. संवर्धन, वाढवणे ४. एकत्र वास्तव्य ७. उगवत्या सूर्याचा देश १०. चंद्रकळेवर असल्यास पांढरी रसत्यावर असल्यास काळी ११. पाट लावल्यास कापडाचा स्वस्तातील प्रकार १३. जयंती १६. जिभेचा नखरा १७. हेतू, स्वार्थ १८. 'चालणाऱ्याचे भाग्य चालते' या संस्कृत वचनात आढळणारे नशीब १९. लोचन २०. हात २१. शहर २२. सिद्धता २३. नाकारार्थी उद्गार २४. चेहरा, मुख २६. सुगरणीच्या पोळीला तीन असतात, चिरोट्याला अनेक २८. बाजू (उचलून धरणे) २९. थंड, गार ३०. प्रयत्न, खटपट ३२. या वर्षी ३३. दारूचा एक प्रकार ३५. नवरा, आमंत्रक ३७. हिमालयकन्या ३९. स्तोत्र, स्तुतीचे गीत ४०. पालिकेतील लोकप्रतिनिधी ४२. अकस्मात, अनपेक्षितरीत्या ४४. श्रेष्ठ पुरुष ४६. हुबेहूब सोंग वठणारा ४८. उसना रूबाब ४९. हिच्यामागे कधीही 'कु' प्रत्यय लागू शकत नाही असे 'रामायण'कारांचे वचन आहे ५०. अनेक कप्प्यांची छोटी पिशवी ५२. सगळ्या मानवजातीच्या रक्ताचा रंग ५३. असा उपदेश काय काम ाचा! ५४. कर्णाची आई पण जननी नव्हे ५५. निष्णात, वाक्बगार ५७. महाराष्ट्रातील इतिहासकालीन प्रसिद्ध घराणे ६०. माया, जिव्हाळा ६२. जिंकलेला ६३. दिवस (संस्कृत) ६४. सापाची एक विषारी जात ६६. कोवळी फांदी ६७. 'आ'काराची उभी रेघ ६८. स्त्री भूत? ६९. धुणे, स्वच्छ करणे ७१. चांगले वर्तन ७२. चंद्राची कड ७३. वाळवी, न्यूनता, उणीव ७५. नमस्कारासाठी आवश्यक गोष्ट? ७६. वाद्य वाजविणारा ७७. विजार ७८. चप्पल, बूट इ. ७९. संगणक आला तरी शिक्कामोर्तबासाठी ही हवीच! ८०. रोटीचा मऊमुलायम प्रकार

उभे शब्द

१. १. जबाबदारीचे ओझे (ला.) २. कालवड ३. नवी ओळख ४. लिंबाचे पेय ५. जागरूक ६. इंद्रिय ८. पचनाला सहाय्यक ९. नऊ भावना १२. पाणी १४. दिवस १५. नियमानुसार, वैध मार्गाने १७. सुसर २१. मोठी नदी २५. नम्रतेने मान खाली घालणे २६. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना २७. विहीर, अळीकडे २८अ. नालस्ती ३०. मेंढपाळ ३१. सर्दी ३४. दुसऱ्याच्या मनातील भाव जाणणारा ३६. म णूसकी ३७. स्वयंपाकाचे कसब ३८. 'नटरंग'मध्ये अतुल कुलकर्णीने साकारलेली भूमिका ४१. अरण्य, जंगल ४२. वनवास ४३. व्यापारी फायदा ४५. मुंबईजवळच्या प्रसिद्ध वृद्धाश्रमाचे नाव ४७. लोभ, तीव्र इच्छा ४८. कोंबड्याचे ओरडणे ५०. पंजातील पहिले बोट ५१. लाकडाची एक उत्कृष्ट जात ५४. श्रीरामाचे स्तोत्रकवच ५६. तेजस्वी, प्रफ ुल्लित ५८. तरतरीत, ताजा --- ५९. शिव! शिव! ६१. मारणे, चोपणे ६४. मळखाऊ ६५. तीव्र ऊन ६७. कृती, अंमलबजावणी ७०. कायदेशीर मध्यस्थ ७१. समारंभपूर्वक सन्मान ७२. शेळीचे पिल्लू ७४. एकोपा, मैत्री ७५. शरीरयष्टी ७७. अष्टविनायकांपैकी एक कोकणातील स्थान

### शब्दकोडे १०६ चे उत्तर

**आडवे उत्तर**
१.अपराध ६.अवसानघातकी ११.दाद १२.सहनशीलता १४.धव १५.वन १६.गडवा १८.जपान २१.समोर २३.क्षण २४.हरकत २७.आब २८.डमरू २९.मजलदरमजल ३२.भान ३३.बटबटीत ३६.पलायन ३९.कलाकार ४१.मतपत्रिका ४४.वादळ ४५.पाक ४६.पसायदान ४९.कालमान ५२.माल ५३.जम ५४.मना ५६.निवारा ५८.दिवाकर ६०.वारा ६१.जनकजननी ६३.जीवन ६५.सावध ६६.नवरा ६७.किटाळ ६८.प्रस्थान ६९.जनमत ७१.तमन्ना ७३.नेपाळ ७५.नम ७६.रपाटा ७८.पवित्र ८०.अवास्तव ८२.गडकरी ८४.मंद ८५.स्तवन ८६.कळवळणे

**उभे उत्तर**
१.अदा २.पदरमोड ३.धसका ४.जन गण मन ५.हलवाहलवी ७.वध ८.सावज ९.घावन १०.तन १३.शीड १७.भाकरकाला १९.पायलट २०.कोंब २२.रमणीय २५.रद २६.तम २७.आमटी ३०.जबरदस्त ३१.जपतप ३४.बक ३५.तडक ३७.नमदा ३८.पत्रिका ४०.कावा ४२.तनमनधनाने ४३.काल ४५.पालक ४७.साजरा ४८.यम ५०.मानिनी ५१.नवा ५२.मावा ५५.नाक ५७.राजीव ५८.दिन ५९.रवाळ ६०.वानप्रस्थ ६१.जव ६२.जळजळ ६४.वरात ६५.सान विवि ६६.नतमस्तक ६७अ.टाकोटाक ७०.मनवा ७२.मरगळ ७४.पालन ७७.पाडणे ७८.पद ७९.त्रस्त ८०.अट ८२.वळ ८३.रीस

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### दिंडोरीचा प्रांताधिकारी अटकेत

**नाशिक ।** न्यूट्रिशन (पोषणद्रव्ये) बनवणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीने 'एनए' न करताच बांधकाम केल्यामुळे त्यांचे उत्पादन बंद करण्याचा इशारा प्रांताधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डॉ. नीलेश अपार यांनी दिला होता. ही कारवाई टाळण्यासाठी त्याने ४० लाखांची लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून एसीबीने डॉ. अपार याला दिंडोरी प्रांत कार्यालयातच बुधवारी अटक केली. फेब्रुवारीतच त्याची अकोल्यातून बदली झाली होती. कंपनीने सर्व नियम पाळून बांधकाम केले, एनएसाठी अर्जही केल्याची कागदपत्रे कार्यालयात देऊन आरोप फेटाळून लावले. परंतु प्रांताधिकारी अपार कंपनी बंद का करण्यात येऊ नये अशी नोटीस बजावली होती. तसेच कारवाई टाळण्यासाठी ५० लाख लाचेची मागणी केली होती. तडजोडीअंती ४० लाख देण्याचे ठरले. पुरावे देऊन कंपनीने एसीबीकडे तक्रार केली.

### वाहन पंक्चरमुळे गुरांची तस्करी उघड

**धुळे ।** शहरानजीक धमाणे (ता. धुळे) फाट्याजवळ गुरांची वाहतूक करणारे पिक-अप (एमएच ४३ एडी ६१८५) वाहन पंक्चर झाले. चालक व इतरांनी पळ काढला. याबाबत माहिती मिळाल्यावर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी सीसीटीव्ही व लोकांची चौकशी करून चालक व इतरांचा शोध सुरू केला. वाहनाची झडती घेतल्यावर त्यात कत्तलीसाठी निर्दयीपणे वाहतूक केली जाणारी आठ गुरे आढळली. सुनील राठोड यांच्या तक्रारीवरून पश्चिम देवपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

# जलजीवन योजनेच्या खर्चात नाशिक जिल्हा राज्यात अव्वल

## तर पुण्याची झेप दुसऱ्या क्रमांकावर; आतापर्यंत सर्वाधिक ९३ कोटींचा खर्च

**नाशिक । प्रतिनिधी**

'हर घर नल से जल' हे घोषवाक्य घेऊन जलजीवन मिशन योजनेची केंद्र सरकारने घोषणी केली. दरम्यान जलजीवन मिशन अतंर्गत कामांबाबत जिल्हयात काही ठिकाणी प्रशासनाला काही तक्रारी आल्या असल्या तरी, या योजनेच्या खर्चात नाशिक जिल्हा हा राज्यात पाहिल्या क्रमांकावर आहे.

या योजनेतंर्गत नाशिक जिल्हयाचा आतापर्यंत सर्वाधिक ९३ कोटी रूपये खर्च झाला असून त्यापाठोपाठ पुणे जिल्हयाचा (७८ कोटी खर्च) क्रमांक लागला आहे. त्याचबरोबर त्रयस्थ यंत्रणा पाहणी अहवाल प्राप्त करत, कामे सुरू करण्यातही नाशिक जिल्हयाने आघाडी घेतली आहे. जलजीवन मिशन योजनेच्या राज्याच्या आढावा बैठकीतील आकडेवारीतून ही माहिती उपलब्ध झाली आहे.

योजनेतंर्गत नाशिक जिल्हयात १२२२ कामे मंजूर झाली असून त्यासाठी १४१०



कोटींचा निधी मंजूर झाला आहे. तर आतापर्यंत १६१ कामे पूर्ण झाली आहे. काही अडचणी किंवा विविध कारणांनी ३० योजना या अद्यापही सुरू झालेल्या नाहीत. तसेच १०३० या योजना प्रगती पठावर आहेत. या योजना सन २०२४ अखेर पूर्ण करायच्या असल्याने दर आठवडयाला या योजनेचा राज्याच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून आढावा घेतला जात आहे. मंगळवारी (दि.२७) झालेल्या आढावा बैठकीत राज्यातील सर्व जिल्हयांचा आढावा झाला. यात नाशिक जिल्हयात जलजीवन मिशन योजनेतंर्गत सर्वाधिक ९७५ कामांचे त्रयस्थ यंत्रणेकडून पाहणी झालेली आहे. यातील ५७३ अहवाल प्राप्त देखील झाले आहेत. त्यामुळे या कामात नाशिक जिल्हा राज्यात आघाडीवर आला आहे. यानंतर पुणे जिल्हयाचा क्रमांक लागतो. पुणे जिल्हयात १२२४ पैकी ५७४ कामांची त्रयस्थ यंत्रणेकडून पाहणी झाली असून २४४ योजनेचे अहवाल प्राप्त झालेले आहेत. पाहणी अहवाल प्राप्त करण्यापाठोपाठ, खर्चात देखील जिल्हयाने अव्वल स्थान पटकविले आहे. कामांस प्रारंभ झाल्यानंतर ३० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर पहिले बिल काढले जाते.

नाशिक जिल्हयात आतापर्यंत ९३ कोटींची बिले काढण्यात आली आहेत. पुणे जिल्हयात ७८ कोटी खर्च झाला असून सातारा ३८ कोटी तर, नागपूर जिल्हयात २७कोटींचा खर्च झाला आहे. योजनेत आता विविध कारणांनी नाशिक जिल्हयात केवळ ३० कामे सुरू न झाल्याचे जिल्हा परिषदेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.

# निवडणुक संदर्भात आपच्या नाशिकच्या बैठकीत महत्वपूर्ण विषयांवर चर्चा




**नाशिक । प्रतिनिधी**

आम आदमी पार्टीचे महाराष्ट्र प्रभारी गोपाल इटालिया यांच्या मार्गदर्शनात पश्चिम महाराष्ट्रात स्वराज्य यात्रा संपन्न झाली. या यात्रेत संपुर्ण महाराष्ट्रातून जवळपास ५०००० कार्यकर्ते सहभागी झाले होते. एकादशीच्या मुहूर्तावर पंढरपूरच्या विठोबा रखुमाईचे दर्शन घेऊन, महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारावर नवीन महाराष्ट्र घडवण्यासाठी पंढरपूर ते रायगड असास्वराज्ययात्रेचा प्रवास होता.

स्वराज यात्रा एकूण १० दिवस पंढरपूर ते रायगड असा एकूण ७८० किलोमीटर प्रवास करणार असून, यात्रा पश्चिम महाराष्ट्रातील ५ व कोकणातील २ जिल्हे, एकूण ११ लोकसभा व ६० पेक्षा जास्त विधानसभा मतदार संघातून मार्गक्रमण करत गेली होती. ही यात्रा संपल्यानंतर आम आदमी पार्टीने लगेचच संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यात जिल्ह्यात आणि गावात स्वराज संवादाचे राज्य उपक्रम राबविलेत. नाशिकमधील द्वारका येथील साई प्रितम हॉटेल येतील सभागृहात महाराष्ट्र प्रभारी गोपाल ईटालिया आणि सुरत लोकसभा अध्यक्ष रजनीकांत वाघांनी यांच्या उपस्थितीत येणाऱ्या लोकसभा, विधानसभा, महापलिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात रणनिती आखली गेली. येणाऱ्या काळात दिल्ली आणि पंजाब मधील लोककल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्रात आप काम करेल अशी माहिती गोपाल ईटालिया यांनी दिली. बैठकीत धुळे, नंदूरबार, जळगाव, नाशिक येतील अध्यक्ष, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांसाठी स्नेहभोजनाचे आयोजनही करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन नाशिक आपने केले होते.

# अंबड, सातपूर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची आयुक्तांशी चर्चा

## मनपाशी संबंधित विविध मागण्यांसंदर्भात बैठकीत मंथन

**नाशिक । प्रतिनिधी**

अंबड, सातपूर औद्योगिक वसाहतीमधील प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी काल रोजी आयुक्त तथा प्रशासक भाग्यश्री बानायत यांची भेट घेतली. महापालिका आणि शासनाच्या इतर विभागांशी संबंधित विविध मागण्यांवर सुमारे दोन ते अडीच तास चाललेल्या बैठकीत सविस्तरपणे चर्चा झाली. बैठकीला महापालिकेसह एमआयडीसी, जिल्हा उद्योग केंद्र, पोलिस आयुक्त कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

स्वतंत्र मलनिस्सारण प्रकल्प मंजूर करावा, अनधिकृत बांधकामाच्या नोटीसा मागे घेण्यात याव्यात, वाढीव घरपट्टी आकारण्यात येऊ नये तसेच प्रकल्पग्रस्त शेतक-यांना पाठविण्यात आलेल्या दंडात्मक नोटीसा मागे घेण्यात याव्यात, १३ मीटर व ९ मीटर रस्ते मंजूर करुन देण्यात यावेत आदींसह प्रकल्पग्रस्तांच्या नऊ मागण्यांवर बैठकीत चर्चा झाली.

एसटीपी प्रकल्पाबाबत एमआयडीसी व मनपा अधिकारी यांनी एकत्रित टोपोग्राफीकल सर्व्हे करुन जागा उपलब्धतेबाबत केंद्र सरकारच्या 'अमृत २' योजनेअंतर्गत डीपीआर तयार करून शासनास पाठवला जाईल, असे मनपाच्या मलनिस्सारण विभागाकडून सांगण्यात आले. तसेच प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी अनधिकृत बांधकाम नियमानुकूल करण्याचा प्रस्ताव मनपास सादर केल्यास प्रस्तावाची छाननी करुन मनपा अधिनियमनुसार कार्यवाही करण्यात येईल, असे नगर रचना विभागाने स्पष्ट केले. तसेच एमआयडीसी मार्फत चार व पाच मीटर रुंद वहिवाटीचे रस्त्यांचे रुंदीकरण होऊन नऊ मीटर व बारा मीटर पोहोच मार्ग रस्ते प्रस्तावित करणेबाबत चर्चा झाली. औद्योगिक मिळकतीकरीता स्वतंत्र वर्गवारी करणेबाबत प्रस्ताव शासनाच्या नगरविकास विभागाकडे पाठवला आहे. त्यास शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर औद्योगिक वसाहतीकरीता वाणिज्य दराऐवजी औद्योगिक मुल्यांकन दर लागू करण्यात येईल. त्या कमी दराप्रमाणे प्रकल्पग्रस्त शेतक-यांनी सुरु केलेल्या औद्योगिक शेडला मालमत्ता कर लागू करण्यात येईल, असे मनपाच्या कर विभागाने चर्चेदरम्यान स्पष्ट केले.

अंबड औद्योगिक वसाहतीसाठी स्वतंत्र पोलिस स्टेशनचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मंजुरीनंतर सदर ठिकाणी पोलीस स्टेशन उभारण्यात येईल, असे आश्वासन पोलिस विभागाने दिले आहे. पीएपी भुखंड देण्याच्या प्रकल्पग्रस्तांच्या मागणीवर सातबारा वर नाव असलेल्या शेतकरी किंवा त्यांच्या वारसांना नियमानुसार भुखंड वाटप करण्यात येईल, असेही आश्वासन एमआयडीसीच्या अधिका-यांनी बैठकीत दिले. बैठकीला अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, उपायुक्त श्रीकांत पवार, उपायुक्त प्रशांत पाटील, अधिक्षक अभियंता उदय धर्माधिकारी, शहर अभियंता शिवकुमार वंजारी, नगर रचना उप संचालक हर्षल बाविस्कर, कार्यकारी अभियंता संजय अग्रवाल, एमआयडीसीचे उपअभियंता नितीन पाटील, उप अभियंता जे. पी. पवार, एमआयडीसी क्षेत्र व्यवस्थापक बी. डी. शेवाळे, क्षेत्र व्यवस्थापक एम. ए. साळी, एमआयडीसीचे पोलीस निरीक्षक राजू पाचोरकर, विशेष शाखा वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र चव्हाण उपस्थित होते.

# श्री शृंगेरी मठात सोमवारी गुरुपौर्णिमा महोत्सव





**नाशिक । प्रतिनिधी**

पंचवटीतील श्री शृंगेरी मठात सोमवारी गुरुपौर्णिमा महोत्सव व महर्षी वेदव्यास पूजन होणार आहे. सकाळी ८ वाजता कार्यक्रमाला प्रारंभ होईल. गुरुवंदन, श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, एकावर्ती रुद्राभिषेक, श्री जगदगुरू आदि शंकराचार्य पादुका पूजन, महर्षी वेद व्यास प्रतिमा पूजन तसेच आद्य गुरुपरंपरेचा सन्मान करण्यात येणार आहे.

दुपारी १२.३० वाजता उपस्थितांना महाप्रसाद वितरण करण्यात येईल. प्रमुख पौरोहित्य वेदमूर्ती रवींद्र पैठणे गुरुजी, वेदमूर्ती संतोष जोशी व सहकारी करणार आहेत. पंचवटीतील सरदार चौकाजवळ श्री श्रुंगेरी शंकराचार्य मठात साडेतीनशे वर्षांपासून जगद्गुरू शंकराचार्य दक्षिणाम्नाय श्रुंगेरी शारदा पिठाधीश्वर यांच्या पवित्र परंपरेतील दोन महासमाधी आहेत. आद्य शंकराचार्यांनी भारताच्या चार दिशांना चार मठांची स्थापना केली. त्याच परंपरेतील नाशिक येथील मठाची स्थापना पहिल्या बाजीराव पेशव्यांच्या काळात श्रुंगेरी शारदा पिठाधीश्वर २७ वे श्री शंकराचार्य सच्चिदानंद भारती महास्वामी ( दुसरे ) यांच्या हस्ते इ. स. १७४० मध्ये झाली. २८ वे शंकराचार्य अभिनव सच्चिदानंद भारती व २९ वे शंकराचार्य नृसिंह भारती यांनी येथील मठात वास्तव्य केले. त्यांच्या महासमाधी येथे आहेत.

यावेळी महर्षी गौतमी गोदावरी वेदविद्या प्रतिष्ठान व वैदिक ज्ञानविज्ञान संस्कृत महाविद्यालयाचे सुमारे ५० वेदविद्यार्थी उपस्थित राहून पौरोहित्यात सहभागी होतील. मठाचे व्यवस्थापक रामगोपाल व्ही. अय्यर यांनी सोमवारी होणाऱ्या महोत्सवाला सर्व भाविकांनी उपस्थित रहावे असे आवाहन केले आहे.

# पावसाळ्याच्या तोंडावर २५० बंधाऱ्यांचे काम पूर्णत्वाकडे

**नाशिक । प्रतिनिधी**

अतिशय महत्त्वाकांक्षी समजल्या जाणाऱ्या मिशन भगीरथ प्रयास या उपक्रमांतर्गत तीन महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या पावसाळ्याच्या तोंडावर आता नाशिक जिल्ह्यात तब्बल २५० बंधारे हे पूर्णत्वास येवू लागले आहेत. दरम्यान पावसाळ्यात हे बंधाऱ्यातील पाणी शेतकऱ्यांना उपयुक्त राहील असा विश्वास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे यांनी दिली.

नाशिक जिल्ह्यात ३६३ कामे मंजूर असून पावसाळ्यापूर्वी यातील बंधाऱ्यांच्या कामांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले होते. तर पावसाच्या आधी ही कामे पूर्णत्त्वास जावी यासाठी कुशल कामगारांच्या कामांना प्राधान्य देण्यात आले आहे. पावसाळ्याच्या तोंडावर २५० बंधारे वापरासाठी पूर्णत्त्वाला गेल्याने मोठ्या क्षमतेने ग्रामीण भागासाठी जलस्रोत उपलब्ध होणार आहे. दरवर्षी उन्हाळ्यात पाण्याच्या टँकरवर जिल्ह्यात कोट्यवधी रूपये खर्च करावे लागतात. यंदाही हा सुधारीत आराखडा सुमारे २७ कोटी रूपयांच्या घरात गेला होता. ग्रामीण भागात पाण्यासाठी महिला पुरुषांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागते. तर काही ठिकाणी मोठी कसरत करूनच पाणी वहावे लागते. अशा प्रकारे जीवाशी सुरू असणारा खेळ थांबविण्यासाठी मिशन भगीरथी प्रयास अंतर्गत टँकरमुक्त जिल्हा करण्याचा संकल्प जिल्हा परिषदेने केला आहे.

# १५ व्या महाराष्ट्र राज्य कॅनोईंग अँड कयाकिंग स्पर्धेत पिंपळगाव महाविद्यालयाचे १९ सुवर्ण पदकांसह वर्चस्व

**नाशिक । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य कॅनोईंग अँड कयाकिंग असोसिएशनच्या वतीने सांगली येथे कृष्णा नदीत, रॉयल कृष्णा बोटक्लब येथे दि. २० ते २४ जून या कालावधीत पंधरावी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत राज्यातील पुणे, नागपूर, सांगली, कोल्हापूर, बीड, परभणी, ठाणे, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहमदनगर इत्यादी २२ जिल्हा संघानी सहभाग घेतला होता. या १५ व्या महाराष्ट्र राज्य कॅनोईंग अँड कयाकिंग स्पर्धेत पिंपळगाव महाविद्यालयाने १९ सुवर्ण पदकांसह वर्चस्व मिळविले आहे.

स्पर्धेचे उद्घाटन आ. गोपीचंद पडळकर, आ. सुधीर गाडगीळ, माजी आमदार दिनकर पाटील व भारतीय कॅनोईंग अँड कयकिंग संघटनेचे सह सचिव दत्ता पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत पुरुष व महिला गटाचे सर्वसाधारण विजेतेपद नाशिक जिल्हा संघाने पटकावले. या विजयात मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या पिंपळगाव येथील क.का.वाघ महाविद्यालयाच्या खेळाडूंनी नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना एकूण १९ सुवर्ण व १ रौप्य पदक पटकावून कॅनोईंग प्रकारातील आपले निर्विवाद वर्चस्व परत




एकदा सिद्ध केले आहे.

या स्पर्धेचे सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून नाशिकच्या साद पटेल व महिला गटात सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून कोल्हापूरच्या प्रणाली कोपर्डे यांना गौरविण्यात आले. नाशिकतर्फे साद पटेल याने ६, हेमंत हिरे याने ६ सुवर्णपदके पटकावली. महिला गटात अनुष्का आंबेकर हिने ५ सुवर्णपदके व योगिता शेळके हिने ३ सुवर्णपदके पटकावली. साद पटेल यास बेस्ट प्लेअर अवॉर्ड देण्यात आला.

**इतर सुवर्णपदक विजेते खेळाडू पुढील प्रमाणे**

प्रथमेश महाले, शुभम हिरे, धनेश भडांगे, अक्षय लिलके, पवन गोडे, उत्तम पवार, ओंकार पगार, विशाल खालकर, अश्विनी वाघ, राखी गेहलोत. यशस्वी खेळाडूंचा संस्थेचे उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, रविंद्र मोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, डॉ. एन. यु. पाटील, प्रा. दिलीप माळोदे, क्रीडाशिक्षक प्रा. हेमंत पाटील, आनंदा पवार उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र संस्थेचे सरचिटणीस ड.नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले, उपाध्यक्ष, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, तालुका संचालक शिवाजी गडाख, शिक्षणाधिकारी डॉ.नितीन जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील, अरुण मोरे यांनी अभिनंदन केले आहे.

# अनुभवी कार्यकर्ते हे परिपक्व वृक्षाच्या पारंब्यासारखेच: पाठक

## भाजप ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलन उत्साहात

**नाशिक । प्रतिनिधी**




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या केंद्र सरकारला ९ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने मोदी९ कार्यक्रमांतर्गत गंगापुर रोडवरील प्रसाद मंगल कार्यालय येथे ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलन संपन्न झाले. या कार्यक्रमाला ४० वर्षापासून नाशिक शहरात भाजपाचे संघटन मंत्री म्हणून काम केलेले रघुनाथ कुलकर्णी, डॉ. राजेंद्र फडके, किशोर काळकर यांची विशेष उपस्थिती होती.

या ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलनात प्रकाश पाठक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जुन्या व नव्या कार्यकर्त्यांचा संगम होऊन देश कार्य घडावे यासाठीचे आजचे संमेलन असून अनुभवी कार्यकर्ते हे परिपक्व वृक्षांच्या पारब्या सारखे आहेत, ते जमिनीत मुरुन पुन्हा नव्या वृक्षाची निमिर्ती करतील. मोदींच्या नेतृत्वात हा देश हिंदु राष्ट्र म्हणून पुढे येवून लवकरच विश्वगुरु बनेल असे प्रकाश पाठक यांनी आपल्या मनोगतात सांगितले. तसेच रघुनाथ कुलकर्णी व डॉ.राजेंद्र फडके यांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला.यावेळी व्यासपीठावर भाजपा नाशिक शहर प्रभारी राजेंद्र गावित, भाजपा शहराध्यक्ष गिरीश पालवे, जिल्हाध्यक्ष केदा आहेर, आ.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ.राहुल ढिकले, लक्ष्मण सावजी, माजी आमदार निशिगंधा मोगल, माजी आमदार बाळासाहेब सानप, माजी महापौर सतिश कुलकर्णी, माजी महापौर रंजना भानसी, मंगला जोशी, संघटन सरचिटणीस प्रशांत जाधव, पवन भगूरकर, जगन पाटील आदी उपस्थित होते. प्रास्ताविक ज्येष्ठ कार्यकर्ता संमेलन संयोजक विजय साने यांनी तर सुत्रसंचालन सुनिल केदार यांनी व आभारप्रदर्शन अभय छल्लाणी यांनी केले. यावेळी ४५० भाजपा ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा शाल, पुष्प व पुस्तक देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमानंतर पदाधिकारी व ज्येष्ठ कार्यकर्ता यांनी एकत्रित स्नेह भोजन घेतले.

# इंडियन मेडीकल असोसिएशनतर्फे जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण

**नाशिक । प्रतिनिधी**

भारतात १ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर्स डे साजरा केला जातो. हा दिवस देशातील महान चिकित्सक आणि पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री डॉ. बिधान चंद्र रॉयच्या आठवणीत साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून इंडियन मेडीकल असोसिएशनच्या नाशिक शाखेतर्फे जीवनगौरव पुरस्काराचे वितरण १ जुलै रोजी नाशिक येथे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयएमएचे अध्यक्ष डॉ. विशाल गुंजाळ, सचिव डॉ. माधवी गोरे-मुठाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या जीवनगौरव पुरस्कार सोहळ्यासाठी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार तसेच आयएमए महाराष्ट्राचे नियोजित अध्यक्ष डॉ. दिनेश ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. युवराज पवार, डॉ. पूनम शिवदे, डॉ. यतींद्र दुबे, डॉ. अभय सुखात्मे, डॉ. तुषार देवरे, डॉ. संजय वेखंडे यांचा जीवनगौरव पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी जास्तीत-जास्त डॉक्टरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक डॉ. प्रेरणा शिंदे, डॉ. शलाका बागुल, डॉ. मृगाक्षी क्षीरसागर यांनी केले आहे. कार्यक्रमासाठी आयएमएचे खजिनदार डॉ.पंकज भट, उपाध्यक्ष डॉ. मनीषा जगताप, सह सचिव डॉ. सागर भालेराव, डॉ. मिलिंद भराडीया परिश्रम घेत आहेत.

# बोरकुंडला पडत्या पावसात निघाली भव्य दिंडी




## विद्यार्थ्यांनी केलेल्या पारंपारिक वेशभुषेने वेधले लक्ष

**धुळे । प्रतिनिधी**

बोरकुंड येथे देवशयनी एकादशीनिमित्त, भर पावसात भव्य दिंडी निघाली. मुक्तांगण शैक्षणिक प्रांगणच्या शेकडो विद्यार्थ्यांनी केलेल्या पारंपारिक वेशभुषेने उपस्थितांचे लक्ष वेधुन घेतले. टाळ-मृदुंगाच्या जयघोषात निघालेल्या या दिंडीत, इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे व सचिव तथा जि.प.सदस्या शालिनीताई बाळासाहेब भदाणे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थ्यांनी फेर धरला. विठ्ठल-रुखमाईसह विविध संताच्या वेशभुषाही यावेळी विद्यार्थ्यांनी साकारल्या.

आषाढी एकादशी निमित्त मुक्तांगण शैक्षणिक प्रांगणातील श्री.विठ्ठल- रुखमाई मंदिरात सकाळी, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.कृष्णा बाळासाहेब भदाणे, अर्जुन बाळासाहेब भदाणे यांच्या हस्ते विठ्ठल रुखमाई मुर्तींचा महाअभिषेक करण्यात आला. यानंतर संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब भदाणे , सचिव तथा जि.प.सदस्या शालिनीताई भदाणे यांच्या हस्ते मनोभावे पूजा करुन महाआरती करण्यात आली. यावेळी पंचक्रोशीतील भाविक, भजनी मंडळ, ग्रामस्थ आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यानंतर मुक्तांगण प्रांगणच्या शेकडो विद्यार्थ्यांची गावातून दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी टाळ, भगवे झेंडे, डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन यात सहभाग घेतला. गावातील राममंदिर पासून वाजत गाजत, टाळ- मृदुंगाच्या गजरात व लेझीमच्या नृत्यात पालखी मिरवणूक काढण्यात आली. शाळेतील मुलांनी वारकऱ्यांची पारंपारिक वेशभूषा केली होती. मुलींनी साडी परिधान करुन डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन तर मुलांनी वारकर्यांचा पांढरा पेहराव करुन सहभाग नोंदविला. दिंडीत लहान मुलांनी विठ्ठल रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ आदी अनेक वेशभूषा केल्याने लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीत बाळासाहेब भदाणे व शालिनीताई भदाणे यांनी फेर धरला. यावेळी गावातील व परिसरातील भाविक मोठ्या संख्येने हजर होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## न्यूज कॉलम

### ट्रकच्या धडकेत मोटरसायकलस्वार ठार

**नवापूर ।** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहा नवापूर-धुळे रस्त्यावर सावरट गावाजवळ ट्रकच्या धडकेने मोटरसायकलस्वार ठार झाल्याची घटना घडली. याबाबत अधिक माहिती अशी की, दुपारी ३ वाजेदरम्यान सुरतकडून धुळ्याकडे जाणारी ट्रक (क्र.जी.जे.०९ व्ही ८५२९) आणि मोटरसायकल (क्र.एम.एच.३९ पी ५४६) यांच्यात जोरदार धडक झाली. सदर घटना नवापूर तालुक्यातील सावरट गावालगत घडली. मोटरसायकल चालक हा महेंद्र अमृतसिंग गावित जागीच ठार झाला आहे.अपघात एवढा भीषण होता की मोटरसायकल चालक महेंद्र गावित याचा चेहरा पूर्ण टायरखाली दाबला गेल्याने चेहर्याचा अक्षरशः चुराडा झालेला दिसून आला.

### कारच्या धडकेत दुचाकी वरील महिला ठार

**धुळे ।** धुळे-साक्री रोडवरील शेवाळी फाट्याजवळ भरधाव वेगाने जाणाऱ्या कारने अॅक्टीवास धडक दिल्याने घडलेल्या अपघातात एक वृद्धा मयत झाल्याची घटना काल घडली. ज्योती संजय नगराळे यांच्यासमवेत भारतीबाई राजाराम आखाडे (६०) ही वृद्ध महिला एमएच ४१ आर ३२७८ या अॅक्टीवा स्कुटीवर बसून जात असतांना शेवाळी फाट्याजवळ भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच ०२ सीई ६३२० या कारने अॅक्टीवास जोरात धडक दिल्याने घडलेल्या अपघातात भारतीबाई आखाडे ही याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे.

## विशेष बालकांच्या दिंडीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले

**नाशिक । प्रतिनिधी**



निरागस विशेष बालके अधिक संवेदनशील असतात. अशा बालकांच्या काढण्यात आलेल्या दिंडीत त्यांनी टाळ, मृदूंगाच्या ठेक्यावर ताल धरला. रायझिंग चाईल्ड डेव्हलपमेंट अँड लर्निंग सेंटरमध्ये झालेल्या दिंडीने परिसरातील सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

आषाढी एकादिवशीच्या सकाळी दिंडीचे आयोजन करण्यात आले. छोट्या वारकऱ्यांचा सांप्रदायिक पोशाखातील उत्साह आकर्षित करीत होता. त्यांनी विठूरायाचा जयघोष करून परिसर दुमदुमून टाकला. संस्थापिका व प्रमुख मार्गदर्शिका मोनिका गोडबोले - यशोद यांनी विद्यार्थ्यांना पंढरीच्या वारीचे महत्व व विठोबाची गोष्ट सांगितली. यावेळी अनुष्का यशोद, ऋतुजा ढोरे, लीना काळे, मयूर कारंडे यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी यांनी परिश्रम घेतले. पुंडलिक वरदा हरी विठ्ठल असा नामघोष करीत दिंडीची सांगता झाली.

## श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह येथे वारी सोहळ्याचे आयोजन



**धुळे ।** मैलोन् मैल चालत, पळत जाऊन वारकऱ्यांनी पंढरपूर गाठले आहे. संपूर्ण राज्य भक्तीसागरात न्हाऊन निघाले आहे. चिमुकल्यांनाही आषाढी एकादशीचे महत्व कळावे तसेच वारी, पालखीचा आनंद मिळावा यासाठी यमुनाई शैक्षणिक व सांस्कृतिक महिला मंडळ संचलित श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह व कार्यशाळा, धुळे येथे आषाढी एकादशी निमित्त वारी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शाळेतील अनाथ विद्यार्थीनींनी वारकऱ्यांची पारंपरिक वेशभूषा केली होती. कपाळी गंध टिळा लावून हाती टाळांचा निनाद करीत विठूमाऊलीच्या पालखी सोहळ्यात सहभाग घेतला. तर विद्यार्थिनींनीसुद्धा डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन फुगड्या घालत तसेच मुली हातात भगवे झेंडे घेऊन वारीमध्ये सहभागी झाल्या होत्या. सकाळी शाळेपासून सुरु झालेली वारी पुढे संपूर्ण बालाजी नगर, साक्री रोड परिसरातून जाऊन शाळेच्या प्रांगणात पालखी सोहळ्याची सांगता झाली. विशेष म्हणजे सर्व प्रवेशित विद्यार्थी अनाथ मतिमंद आहेत. त्यामुळे या पालखी सोहळ्यात सहभागी झाल्याने या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. कोणी विठोबा तर कोणी वासुदेव बनले होते. सकाळी शाळेच्या मैदानावर पालखी सोहळा पार पडताच पंढरपुरच्या वारीप्रमाणेच रिंगण देखील येथे आयोजित करण्यात आले होते. सोहळ्याचे आयोजन सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंदानी केले होते.




## साक्री येथील मुकुंद नगरमध्ये विद्यार्थ्यांची आषाढी एकादशी निमित्त दिंडी

**साक्री । प्रतिनिधी**

विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल.... चा जयघोष करत लासलगाव शहरात श्री आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दिवसभर हजारो भाविकांची रेलचेल मंदिरात पाहायला मिळाली. विठूमय वातावरण येथे झाल्याचे चित्र होते.

अंगणवाडी क्रमांक २१ मुकुंदनगर येथील चिमुकल्या बालकांनी विठ्ठल रुक्मिणी वारकरी यांच्या साजरी वेशभूषा करून व डोक्यावर तुळस हाती टाळ घेऊन प्रभात फेरी काढण्यात आली. आषाढी एकादशी उत्साहात करण्यात याप्रसंगी अंगणवाडी सेविका सौ संगीता भालचंद्र शिंदे, पालक पुष्पाबाई गोकुळ पवार, निर्मला रमेश लाडे, रिंकल देवरे, नजमा मंसूरी, उर्मिला भामरे , बिराडे उपस्थित होते.

## भाजप शहराध्यक्ष पालवेंनी घेतली पुरवठा विभागाचे मुख्य सचिव वाघमारे यांची भेट



### विविध महत्वपूर्ण विषयावर चर्चा करून मागण्या मांडल्या

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक महानगर भाजपा शहराध्यक्ष गिरीश पालवे यांनी महाराष्ट्र राज्याचे पुरवठा विभाग मुख्य सचिव विजय वाघमारे यांची सदिच्छा भेट घेऊन विविध महत्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. भटक्या विमुक्त समाजातील लोकांना रेशनकार्ड उपलब्ध करुन द्यावे, नासिकरोड येथील धान्य वितरण कार्यालय नासिकरोड येथे एक कक्ष ठेऊन नासिक शहरातील जनतेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय आवार येथे कार्यालय आणावे आदी मागण्या करण्यात आल्या.

'शासन आपल्या दारी' या योजनेअंतर्गत रेशन विषयक नासिक शहरात विविध भागात कॅम्प घेऊन सामान्य नागरिकाना रेशनवरील पंतप्रधान योजनेचे धान्याचे लाभ मिळवून देण्याचे प्रयत्न करावे अशीही विनंती पालवे यांनी वाघमारे यांच्याकडे केली. दरम्यान सचिव वाघमारे यांनी त्याला त्वरित मान्यता दिली. याप्रसंगी भाजपा नाशिक विभागीय उपायुक्त प्रज्ञा बढे-मिसाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी रमेश मिसाळ, रेशन दुकानदार संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेश सदावर्ते, भाजपा शहर सरचिटणीस सुनील केदार, शहर सचिव संतोष नेरे, उमेश वैद्य आदी उपस्थित होते.


## बायजूस कॅम्पस ड्राईव्ह मध्ये केतन पाटील या विद्यार्थ्याची निवड

**शिरपूर । प्रतिनिधी**

येथील आर. सी. पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील बी.सी. ए. च्या केतन पाटील या विद्यार्थ्याची बायजूस कॅम्पस ड्राईव्ह मध्ये ट्रेनी बी.डी.ई. या पदावर वार्षिक ८.५० लाख रुपये वेतनश्रेणीवर निवड झाली. बायजूस, पुणे या कंपनीचा संस्थेतील आर. सी.पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात सर्व पात्र विद्यार्थ्यासाठी व्हर्च्युअल कॅम्पस ड्राईव्ह घेण्यात आला. महाविद्यालयातील सर्व अंतिम वर्षाचे विद्यार्थी पात्र होते.

या प्रक्रियेत व्हर्च्युअल पद्धतीने दोन स्तर घेण्यात आले. त्यात वीडीओ कॉल राउंड, टेक्निकल राउंड घेण्यात आला. त्यात महाविद्यालयातील बी.सी. ए च्या केतन पाटील या विद्यार्थ्याची निवड झाली. या निवड प्रक्रियेच्या यशस्वीते साठी ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर हर्षल बडगुजर, प्रा.बी. एस.पंचभाई, प्लेसमेंट समिती यांनी प्रयत्न केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव प्रभाकरराव चव्हाण, माजी कुलगुरू डॉ. के.बी. पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील, उपप्राचार्य डॉ.ए.एम.पाटील, डॉ.आर.डी. जाधव, गणेश सोनार, सर्व शाखा विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले.

## अंचाडेतांडा शालेय विदयार्थ्यांशी सीईओ बुवनेश्वरी यांचे हितगुज



**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा अंचाडेतांडा (ता. धुळे) येथे धुळे जिल्हयाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती बुवनेश्वरी एस. यांनी अचानक भेट दिली. श्रीमती बुवनेश्वरी यांनी पहिली ते चौथीच्या वर्गात जावून प्रत्यक्ष विद्यार्थीची भेट घेतली. अक्षर ओळख वाचन व संख्या ज्ञान यांवर आधारीत हसत खेळत वातावरणात विद्यार्थ्यांशी हितगुज केले. शिक्षणाधिकारी राकेश साळुंखे उपस्थित होते.

श्रीमती बुवनेश्वरी यांनी प्रत्येक वर्गात विद्यार्थ्यांची उपस्थिती वर्गशिक्षकांचे नियोजन, परिसर स्वच्छता, शाळेतील वातावरण व स्थलांतर याबाबत शिक्षकांनी घेतलेली मेहनत, याबददल समाधान व्यक्त केले. स्कॉलरशीप, नवोदय इ. स्पर्धात्मक परिक्षेत विदयार्थ्यांसाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे, अशी सूचनाही त्यांनी केली. शिक्षणाधिकारी साळुंखे यांनीही शैक्षणिक गुणवत्ता बाबत व विदयार्थ्यांची पायाभूत ज्ञान बाबत समाधान व्यक्त केले.

धुळे पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी सुरेखा देवरे, शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल घुगे, केंद्रप्रमुख अनिल वानखेडे यांचेही शाळेला मार्गदर्शन लाभत आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी अचानक दिलेल्या भेटी दरम्यान शिक्षकांना प्रेरित करून मार्गदर्शन केले, त्याबददल शाळेचे मुख्याध्यापक संजय ठाकूर, श्रीकांत मोरे, विजय गवळे, श्रीमती भूमिका पाटील, राजेंद्र पाटील यांनी आभार व्यक्त केले.

## शिवसेना ठाकरे गटाच्या नूतन ४४ प्रभाग प्रमुखांचा सत्कार

**नाशिक । प्रतिनिधी**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या नाशिक महानगरातील उर्वरित नवनियुक्त विधानसभा प्रमुख, महानगर समन्वयक, महानगर संघटक, विधानसभा समन्वयक, विधानसभा संघटक, उप महानगरप्रमुख, उप महानगर संघटक, उप महानगर समन्वयक, विभागप्रमुख, विभाग संघटक, विभाग समन्वयक, उप विभागप्रमुख व ४४ प्रभागप्रमुखांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन कार्यालयात सत्कार करण्यात आला.

व्यासपीठावर उपनेते सुनील बागुल, सह संपर्कप्रमुख दत्ता गायकवाड, जिल्हाप्रमुख विजय करंजकर, महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, उपजिल्हाप्रमुमहेश बडवे, सचिन मराठे, भाविसे जिल्हा संघटक वैभव ठाकरे, विधानसभा प्रमुख बाळासाहेब कोकणे, शैलेश सूर्यवंशी, महानगर संघटक देवा जाधव, महानगर समन्वयक नितीन चिडे, माजी नगरसेवक मूशीर सैय्यद, प्रशांत दिवे, भैय्या मणियार, युवासेना उपजिल्हाधिकारी बाळकृष्ण शिरसाठ यासह शिवसेना महानगर पदाधिकारी मसूद जिलानी, रुर्षी वर्मा, निलेश सांळूके, सुभाष शेजवळ, विरेंद्र टीळे, राजेंद्र नानकर, संतोष ठाकूर, हार्षद पटेल, संतोष फुले आदी होते. शिवसेना सोडून गेलेल्या गद्दारांची न घरका न घाटका अशी अवस्था झाली असून ते अक्षरशः भाजपाच्या ताटाखालचे मांजर बनले आहेत, असा आरोप शिवसेना सह संपर्कप्रमुख दत्ता गायकवाड यांनी केला. एकनाथ शिंदे यांच्या ओंजळीत पक्षाने भरभरून पदांचे दान टाकले तरी या माणसाने उद्धव ठाकरे यांच्या पाठीत खंजीर खुपसला. जनता तसेच निष्ठावंत शिवसैनिक त्यांना कदापी माफ करणार नाहीत, असे जिल्हाप्रमुख प्रमुख विजय करंजकर आपल्या मनोगतात म्हणाले उद्धव ठाकरेंची साथ सोडून मिंधे गटात गेलेल्या नाशिक महानगर आणि जिल्ह्यातील नेत्यांची अवस्थाही अत्यंत बिकट असून ते सारे तोंड लपवत पळत आहेत. या गद्दारांना आपणास धडा शिकवायचा आहे. त्यासाठी सज्ज राहा, असे आवाहन माजी आमदार वंसत गिते, माजी महापौर विनायक पांडे, माजी मनपा गटनेते विलास शिंदे यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना केले. आगामी महापालिका निवडणूक म्हणजे आपली सत्त्वपरीक्षाच आहे. समाजोपयोगी विविध उपक्रम हाती घ्या, पक्ष संघटना मजबूत करा असे आवाहन महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर यांनी केले.

ADMISSION शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था ADMISSION

विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे

NAAC Accredited 'B' Grade

वडेल रोड, एमएसईबीजवळ, वलवाडी, धुळे

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव, कोड नं. 200111

B.Sc | B.C.A | M.M.S./ M.C.M.

डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्या S.Y. Bsc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत

संपर्क – प्रा. ललिता निकम – ८८६२०४४४९१ प्रा. जागृती पाटील – ७८८७१३४३६५

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ, नाशिक, कोड नं. 5299A

B.A., B.C.A., B.Sc., M.A. M.C.A., M.B.A.

सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल

संपर्क – प्रा. हर्षल पाटील – ९४२१२८३५७७ श्री. नितेश पाटील – ९९२२११६४३८

प्रा. भुषण पाटील – ७७०९१००९९८

शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. कोड नं. 2053

P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology

पात्रता – बीएससी केमेस्ट्री, बॉटनी, झुलॉजी, मायक्रो बायोलॉजी / बी.फार्म / बी.ए.एम.एस / बी.डी.एस. / एम.बी.बी.एस.

– संपर्क – प्राचार्य डॉ. के. बी. पाटील ९४२२२८८५१८, सौ. शारदा पाटील – ९४२३४९६३४४

प्राचार्य. डॉ. आर.बी. पवार – ९४२०३७५७३५

प्रा. डॉ. योगेश बोरसे – ९४२३३७८९३६ श्री. हर्षल पाटील – ९४२१२८३५७७

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# विठुरायाच्या दर्शनासाठी भर पावसातही भाविकांच्या रांगा

















धुळे । आषाढी एकादशीनिमित्त धुळे जिल्ह्यात विभागातील वैष्णवजनांनी स्थानिक विठ्ठल मंदिरात तसेच विविध ठिकाणी टाळ मृदुंगाच्या गजरात विठ्ठलाचे नामस्मरण करत दर्शन घेतले. शहरातील विविध मंदिरांमध्ये भाविकांची विठ्ठलाच्या दर्शनासाठी पहाटेपासून आकार वाजेपर्यंत रांगा लागल्या होत्या. तर मंदिर परिसरात आरती, महाप्रसाद, भजन, कीर्तन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील मालेगाव रोडवर असलेल्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी होणारी भाविकांची गर्दी यंदाही कायम होती. आषाढी एकादशी निमित्त शहर परिसरातील मंदिरांवर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसराला यात्रेचे स्वरुप प्राप्त झाले होते. अनेक व्यावसायिकांनी लहान मुलांच्या खेळणी, पाळणे, मिठाईची दुकाने लावली होती. तसेच फुलं-फळ, हार, नारळ तसेच इतरी वस्तू विक्रेत्यांचा यावेळी समावेश होता. आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मालेगाव रोडवरील वाहतूक व्यवस्थेत तात्पुरता बदल केला होता. त्यानुसार पहाटे पाच ते रात्री अकरा वाजेपर्यंत या रस्त्यावरील वाहतूक वळविण्यात आली. मंदिर परिसरात अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्हा पोलिस दलानेही पोलिस बंदोबस्त तैनात केले होता. एकादशीनिमित्त मोबाइलवर विठ्ठल भक्तीचा महापूर आल्याचे दिसून आले. अनेकांनी विठ्ठलच्या वेगवेगळ्या प्रतिमा असलेले मेसेस पाठवून एकमेकांना एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच अनेकांनी डीपी आणि स्टेट्सवरही विठू रायाची प्रतिमा ठेवली होती. आषाढी एकादशीनिमित्त शिरपूर तालुक्यातील बाळदे येथे प्रतिपंढरपूर मानल्या जाणार्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये भाविकांची अलोट अशी गर्दी दर्शनासाठी झाली होती. विठुरायाच्या दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांनी रांगा लावल्याचे दिसून येत आले. प्रति पंढरपूर म्हणून ख्याती असलेल्या बाळदे येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने यात्रोत्सव भरवला जातो. मोठ्या संख्येने भाविकांनी विठुरायाचे दर्शन घेतले आहे.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र





# आषाढी सोहळा :वारकऱ्यांच्या भक्तीने पंढरी सजली











एकीकडे हरीनाम आणि विठ्ठल भक्तीने पंढरी सजली आहे. सर्व संतांच्या पालख्या पंढरीत विसावल्या आहेत. टाळ मृदंग, भजन, कीर्तन आणि भाविकांची गर्दी दिसून येत आहे. सायंकाळपर्यंत जवळपास ८ ते ९ लाख भाविक दाखल झाले आहेत. बुधवारी दुपारी विठ्ठलाची दर्शन रांग पत्रा शेड १० च्या पुढे गेली होती. शेवटच्या भाविकाला दर्शन घेण्यासाठी साधारणपणे १४ ते १५ तास लागत असल्याची माहिती श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. पावलो पंढरी पार नाही सुखा भेटला हा सखा मायबाप . या अभंगाप्रमाणे भाविकांची विठ्ठल दर्शनाची तृष्णा पूर्ण झाली. यंदा पावसाने ओढ काढल्याने यात्रेवर परिणाम होईल असे वाटत होते. मात्र राज्यात काही ठिकाणी पाऊस सुरू आहे. त्यामुळे पेरणीची कामे सुरू झाली आहे. परिणामी प्रशासनाने जो अंदाज व्यक्त केला. त्यापेक्षा कमी भाविक दाखल झालेत. असे असले तरी येथील मठ, धर्मशाळ, लॉज, मोकळे पटांगण जिथे जागा मिळेल तिथे भाविकांच्या राहुट्या, तंबू, पहावयास मिळत आहे. तसेच शहरातील मंदिर परिसर, प्रमुख रस्त्यावर भाविकांची वरदळ आहे. सर्वत्र भजन, कीर्तन, हरिनामाच्या गजराने नगरी दुमदुमून निघाली आहे. मंदिर समितीने दर्शन रांगेतील भाविकांना पावसाचा त्रास होऊ नये म्हणून शेड उभे केले आहेत. या शिवाय आरोग्य, पिण्याचे पाणी, नाष्टा दिला जात असल्याचे मंदिर समितीचे सह अध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. चंद्रभागा नदीच्या पैलतीरावरील ६५ एकर जागेत भाविक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. कोणताही अनुचीत प्रकार होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त तसेच गर्दीच्या ठिकाणी 'माउली पथक' पोलीस प्रशासनाने तैनात केले आहे. यंदा जादा एस.टी बसेस सोडण्यात आल्याने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त दिसून आली.

**ग्राउंड रिपोर्ट : पुरुषोत्तम पाटील**